Jannayak Birsa Munda GovernmentMedical College, Nandurbar

जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार.

सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

पत्ता : जिल्हा सामान्य रुग्णालय परिसर, साक्री रोड, नंदुरबार- 425412.

Website -htpp://gmchnandurbar.comE-Mail:- deangmchnandurbar@gmail.com


जा.क्र.जबिमुंशावैमनं/किरकोळ भांडार /बैठक / १८१ /२०२६ दिनांक: ०८ /०१/२०२६

**दरपत्रक मागणीपत्र**

प्रति,

१.

२.

३.

**विषय:-दरपत्रक मोहोरबंद लिफाफे सादर करणेबाबत...**

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून नंदुरबार येथे नव्याने १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय नंदुरबार येथे कार्यान्वित झालेले आहे. महाविद्यालयाचे नाव जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार असे झालेले असल्याकारणाने व त्याच बरोबर महाविद्यालय एमसीएच इमारत येथे स्थलांतरित झालेले असल्याकारणाने प्रशासकीय कार्यालय तसेच महाविद्यालयातील विविध विभागांकरिता विभाग पाट्या तसेच नामफलक ॲक्रलिक मध्ये बनवून मिळणे बाबत पुरवठा करणे कामी दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर नामफलक/पाट्या ॲक्रलिक बनविण्याचे दर हे खालील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे सादर करण्यात यावेत.

| अ.क्र. | तपशील | दर |
|---|---|---|
| ०१ | ६” X १८” | |
| ०२ | १२” X १८” | |
| ०३ | २४” X ३६” | |
| ०४ | ३६” X ४८” | |
| ०५ | ३६” X ७२” | |

त्यास अनुसरुन, प्राप्त झालेल्या मागणीपत्राच्या अनुषंगाने महाविद्यालय अंतर्गत असलेल्या विविध विभागांसाठी **ॲक्रलिक शीट** पुरवठा करणे करिता मोहोदरबंद लिफाफेमध्ये दरपत्रके मागविण्यात येत आहे. आपला मोहोरबंद दरपत्रकाचा लिफाफा विहित मुदतीत या कार्यालयाच्या आवक शाखेत खालील अटी व शर्तीनुसार सादर करावा.

**महत्वाच्या अटी व शर्ती**

१) दरपत्रक मोहोरबंद लिफाफा **दिनांक १६ /०१/२०२६ रोजी सायंकाळी ५.३० वाजेपर्यंत** कार्यालयास पोहचतील या बेताने पाठवावे. जाहीर केलेल्या तारखेनंतर अथवा कार्यालयीन वेळेनंतर आलेले दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही /ग्राह्य धरले जाणार नाही.

२) सूचना फलक/संस्थेच्या संकेतस्थळावर जाहीर नोटीसप्रमाणे इच्छुक कंपनीस देखील दरपत्रक मोहोरबंद लिफाफा सादर करण्याची मुभा देण्यात येत आहे.

३) दरपत्र मोहोरबंद लिफाफा **"अधिष्ठाता, जननायक बिरसा मुंडा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार"** यांचे नावे विहित मुदतीत कार्यालयास सादर करावा. त्याचप्रमाणे दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यावर पुरवठा करावयाच्या बाबीचा लिफाफ्यावर डाव्या बाजूस **"दरपत्रक"** लिफाफा जमा करण्याचा अंतिम दिनांक, दरपत्रक धारकाच्या नावाचा शिक्का इ. नमूद असणे आवश्यक आहे.

४) दरपत्रक मोहोरबंद लिफाफे ही **दिनांक /०१/२०२६ रोजी सकाळी ठीक ११.०० वाजता** मा.अधिष्ठाता यांच्या दालनात संस्थास्तरावर गठीत समितीसमोर उघडण्यात येतील. आपणास जर दरपत्रक मोहोरबंद लिफाफे उघडण्याच्या प्रक्रियेत सहभाग घ्यावयाचा असल्यास नियोजित वेळेत स्वखर्चाने उपस्थित राहावे.

५) दरपत्रकातील दर हे दिनांक /०१/२०२६ पर्यंत ग्राह्य राहतील. करीता आपणास ग्राह्य दरानेच वस्तुंचा पुरवठा करणे बंधनकारक राहील.

६) प्रस्तावित पुरवठा/सेवेंकरीता दरपत्रकात आकारण्यात आलेले दर हे बाजारभावापेक्षा अधिक नसावेत. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक व दर्जा/गुणवत्ता उत्कृष्ठ असेल, अशाच दरपत्रकाचा विचार करण्यात येईल.

७) सदर पुरवठा बाबीची किंमत, जीएसटी कर व एकूण किंमत असे स्वतंत्रपणे दर्शविण्यात यावे. दरपत्रकात खाडाखोड करण्यात येवू नये.

८) दरपत्रक मोहोरबंद लिफाफ्यात सादर करावयाचे दस्तऐवज (Document):- अधिकृत लेटरहेडवर दरपत्रक सादर करावे. १) दुकानाचा परवाना/व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्रक, ३) PAN कार्डची प्रत, ३) अनुभव प्रमाणपत्र, ४) जी.एस.टी. प्रमाणपत्र, ५) आयकर विवरणपत्र

९) सदर पुरवठा आदेश दिल्यानंतर दरपत्रक तसेच पुरवठा आदेशातील अटी व शर्तीनुसार पुरवठा विहित मुदतीत करणे आपणावर बंधनकारक राहील. विहित मुदतीत सोबत जोडलेल्या यादीनुसार व विनिर्दिष्ठेनुसार वस्तुंचा पुरवठा न केल्यास द्वितीय न्यूनतम दरपत्रकधारकास पुरवठा आदेश देण्यात येतील.

१०) अपवादात्मक परिस्थितीमुळे उक्त कोणत्याही अटीत आवश्यकतेनुसार अंशत: बदल करणे, अथवा प्राप्त झालेले दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारणे/नाकारणे, तसेच कोणत्याही स्तरावर पुरवठा प्रक्रिया रद्द करणे इ. अधिकार संस्थाप्रमुख (अधिष्ठाता, **जननायक बिरसा मुंडा** शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नंदुरबार) यांनी राखून ठेवलेले आहेत.

अधिष्ठाता,
**जननायक बिरसा मुंडा** शासकीय
वैद्यकीय महाविद्यालय,नंदुरबार

प्रत:- १.कार्यालयाच्या सूचना फलक, २. College website